Date: 21/11/2023

To,
**BSE Ltd**
Phiroze Jeejeebhoy Tower,
Dalal Street Fort,
Mumbai – 400001

**Subject: Intimation under Regulation 30 and Regulation 47 of SEBI (Listing Obligation and Disclosure Requirements) Regulation, 2015**

Dear Sir/Ma'am,

With reference to the subject referred Regulation, we would like to inform you that the Unaudited financial results for quarter and half year ended September 30, 2023 has been published in The Business Standard Newspaper in English on 14th November, 2023 & Tarun Bharat Newspaper in Marathi on 14th November, 2023. A copy of the said newspaper advertisements are enclosed for your reference & record.

Please take note of the same.

**For, Joy Realty Limited**

KOMAL MANGHARAM KESHWANI

Digitally signed by KOMAL MANGHARAM KESHWANI
Date: 2023.11.21 14:40:42 +05'30'

**KOMAL KESHWANI**
**Company Secretary & Compliance Officer**

**Encl.: As above**

**CC**
**To,**
**Listing Compliance Department,**
**MCX-sx Limited,**
**Vibgyor Towers, 4th floor,**
**Plot No C 62, G - Block,**
**Opp. Trident Hotel, Bandra Kurla Complex,**
**Bandra (East), Mumbai – 400 098**

# फटाक्यांमुळे ठाण्यात आगीच्या ८ घटना

**ठाणे, दि. १३ : प्रतिनिधी**

दिवाळीच्या पहिल्याच दिवशी म्हणजे रविवार, दि. १२ नोव्हेंबर रोजी दिवसभरात फटाक्यांमुळे तब्बल आठ ठिकाणी आगी लागल्याच्या घटनांची नोंद ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन कक्षात झाली. या आगीच्या घटना जरी किरकोळ असल्या तरी त्या आगी नियंत्रणात आणण्यासाठी अर्धा आणि एक तासाचा कालावधी लागला. ताडाच्या आणि माडाच्या झाडालाही किरकोळ आगी लागल्या. सुदैवाने या घटनेत कोणालाही दुखापत झाली नाही.

दिवाळी पहाट होण्यापूर्वीच वाघबीळ शिवकृपा नगर येथे मध्यरात्री लाकडी बांबूच्या शेडवरील प्लास्टिक ताडपत्री व मंडप साहित्याला आग लागली. या आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले. दुसरी घटना वागळे इस्टेट, मेंटल हॉस्पिटलच्या आवारामधील एका ताडाच्या झाडाला आग लागल्याची घटना सायंकाळी ५.४५ वाजण्याच्या सुमारास घडली. रात्री ८.४५ वाजण्याच्या सुमारास कळवा पारसिक नगर या ठिकाणी कचऱ्याला आग लागली. चौथी घटना आझाद नगर, ब्रह्मांड येथे रात्री मोकळ्या मैदानातील कचऱ्याला व महावितरणच्या विद्युत केबलला आग लागली.

## सुदैवाने जीवितहानी नाही



पाचवी घटना रात्री ९.३० वाजण्याच्या सुमारास ढोकाळी येथील हायलॅण्ड गार्डन, बी २ इमारतीच्या तेराव्या मजल्यावरील महेश कुमार यांच्या घराच्या खिडकीमध्ये ठेवण्यात आलेल्या कबुतरांची जाळी व इतर पेपर साहित्याला आग लागली. सहावी घटना राबोडी, वृंदावन सोसायटीत घडली. या ठिकाणी असलेल्या नारळाच्या झाडाला सायंकाळी ५.४५ वाजण्याच्या सुमारास आग लागली. वागळे इस्टेट, रामनगर येथे १०.१५ वाजण्याच्या सुमारास कचऱ्याला आग लागली, तर आठवी घटना ही बाळकुम, दादलानी पार्क येथील सोमवारी पहाटे ३.३० वाजण्याच्या सुमारास मोटर गॅरेजच्या शेडवरील ताडपत्रीला आग लागली. या घटनेत दुरुस्तीसाठी शेडखाली उभी केलेल्या खासगी बसच्या पुढील बाजूच्या काचेला तडे जाऊन किरकोळ नुकसान झाले. या आठ ही घटनांमध्ये कोणालाही दुखापत झालेली नसून, या आगी फटक्यांनी लागल्याची शक्यता ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

# ३ कोटींच्या खाद्यवस्तू जप्त

## नवी मुंबईत 'एफडीए'ची कारवाई

**ठाणे, दि. १३ : प्रतिनिधी**

ठाणे अन्न व औषध प्रशासन विभागाने नवी मुंबईतील एमआयडीसी, तुर्भे येथील मे अमर युनिव्हर्सल प्रा. लि. येथे केलेल्या तपासणीत मसाले पदार्थ, कडधान्ये, सुका मेवा असा एकूण २ लाख, ८७ हजार, ८५१ किलोंचा खाद्यवस्तू असलेला मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्याची बाजारभाव किंमत ३ कोटी, ६ लाख, ७४ हजार, ९६० रुपये इतकी असून हा साठा कमी दर्जाचा व मुदतबाह्य असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

अन्न व औषध प्रशासन विभागाच्या निर्देशानुसार, विविध अन्न पदार्थांचा साठा करत असलेल्या राज्यातील कोल्ड स्टोअरेजची तपासणी मोहीम हाती घेतली आहे. या पार्श्वभूमीवर दि. ९ नोव्हेंबर रोजी केलेल्या तपासणीत जनहित व जन आरोग्याच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाच्या तरतुदीचे पालन होत नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले. त्यानुसार उपरोक्त किंमतीचा साठा कमी दर्जाचा व मुदतबाह्य असल्याचे संशयावरून तसेच 'अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६'अंतर्गत उल्लंघन होत असल्याने तसेच कायद्यातील तरतुदींचा भंग करत असल्याने साठा जप्त करण्यात आला. साहाय्यक आयुक्त, (अन्न) सुरेश देशमुख, साहाय्यक आयुक्त जी. व्ही. जगताप, यो. हि. ढाणे यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी बी. सी. वसावे, पी. एस. पवार, एस. एस. खटावकर, आय. एन. चिलवते या पथकाने ही कारवाई केली.

दरम्यान, सदर कारवाईमुळे खळबळ माजली असून, सामान्य जनतेतून स्वागत होत आहे. ग्राहकांना कमी दर्जाचा आणि मुदतबाह्य वस्तू विकत असल्याचा प्रकार गंभीर असून अशा प्रकारची कारवाई होणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.

## थोडक्यात

### मनोज बारोट यांची नियुक्ती



**खानिवडे :** भारतीय जनता पक्षाच्या वसई-विरार प्रसिद्धी प्रमुखपदी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष मनोज बारोट यांची नियुक्ती करण्यात आली असून, तसे पत्र त्यांना जिल्हा अध्यक्ष महेंद्र पाटील यांनी दिले. यावेळी माजी जिल्हाध्यक्ष राजन नाईक उपस्थित होते. पक्ष संघटन मजबूत व्हावा, यासाठी मी अधिक परिश्रम घेत, ही जबाबदारी पार पाडण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे बारोट यांनी यावेळी सांगितले .

### सायकल राईडमधून प्रदूषणमुक्त दिवाळीचा संदेश

**ठाणे :** वाढते प्रदूषण पाहता प्रदूषणमुक्त दिवाळी साजरी करा, हा संदेश देण्यासाठी 'आम्ही सायकलप्रेमी' संस्थेच्यावतीने 'चला पर्यावरणस्नेही दिवाळी साजरी करू' या सायकल राईडचे आयोजन केले होते. सायकल राईड व त्यानंतर दिवाळी फराळचे आयोजन केले असल्याची माहिती संस्थेच्या संस्थापिका, अध्यक्षा प्रज्ञा म्हात्रे यांनी दिली. निवृत्तीनंतर ज्येष्ठ सायकलप्रेमींनी टूरिंग राईड करत जीवनाचा आनंद घ्यावा, अशी माहिती सायकलमध्ये विश्व विक्रम करणारे सतीश जाधव यांनी दिली. प्रशांत ठोसर, 'ठाणे गौरव सेवा प्रतिष्ठान'चे डॉ. राजेश मढवी आदींचे सहकार्य लाभले.

### तुर्भे येथे अल्पदरात दिवाळीचा शिधा वाटप

**नवी मुंबई :** 'संकल्प सामाजिक स्वयंसेवी संस्थे'च्यावतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही दीपावलीनिमित्त तुर्भे ई २ टाईप रहिवाशी संघाच्या कार्यालयात अल्पदरात रवा, मैदा व डालड्याचे (दिवाळीचा शिधा) वाटप करण्यात आले. सनदी लेखापाल ए. एम. शेट्टी, महापलिका रुग्णालयातील मेडिकल रेकॉर्ड ऑफिसर डॉ. राजेश ओतुरकर वाशी यांच्या हस्ते या वस्तूंचे वाटप करण्यात आले. २००हून अधिक महिलांनी याचा लाभ घेतला, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष अशोक सकपाळ यांनी दिली. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी 'संकल्प सामाजिक स्वयंसेवी संस्थे'चे शांताराम धनावडे, अंकुश सकपाळ, रामचंद्र पाटील, संतोष कांबळे, मनोहर सकपाळ यांनी परिश्रम घेतले.

### मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते आज महेश कोठारे यांना पुरस्कार

**ठाणे :** 'गंधार' या बालनाट्य संस्थेच्यावतीने देण्यात येणारा यंदाचा 'गंधार गौरव पुरस्कार' ज्येष्ठ अभिनेते महेश कोठारे यांना जाहीर झाला असून मंगळवार, दि. १४ नोव्हेंबर रोजी आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते देण्यात येणार आहे. गडकरी रंगायतन येथे सकाळी ११ वाजता हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला असून, यावेळी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, उद्योग मंत्री उदय सामंत, मुंबई भाजप अध्यक्ष आ. आशीष शेलार, माजी खासदार संजीव नाईक, आ. संजय केळकर, आ. निरंजन डावखरे, ज्येष्ठ संगीतकार अशोक पत्की, ज्येष्ठ अभिनेते विजय गोखले, विजय पाटकर उपस्थित राहणार आहेत.

### रेवदंडा येथे फराळ वाटप

**मुरुड जंजिरा :** सामाजिक क्षेत्रात उपक्रम राबविण्यात अग्रेसर असलेले व्यक्तिमत्त्व शरद गोंधळी यांच्यातर्फे रेवदंडा येथील श्री हरेश्वर देवस्थान मैदानात नवनिर्वाचित सरपंच प्रफुल्ल मोरे मान्यवरांच्या उपस्थितीत दिवाळी फराळ साहित्याचे वाटप करण्यात आले. कोर्लई, रेवदंडा, चौल, थेरोंडा, पालव, आग्राव येथील १ हजार, ५०० गरजूंना दिवाळी फराळाच्या साहित्याचे वाटप करण्यात आले.

## जाहीर नोटीस

या नोटिसद्वारे तमाम लोकांना कळविण्यात येते की, **साई दरबार सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित.** फ्लॅट क्र - **११०,** इमारत क्र. २५, बी-विंग, पहिला मजला, **साई दरबार सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित.,** हिरानंदानी आकृती, लल्लूभाई कंपाउंड, मानखुर्द, मुंबई-४०००४३, या संस्थेचा नोंदणी क्र. **MUM/WM/HSG/TC/10468/2011-12** हा असून संस्थेत खालील दिलेला विवरण व माहिती प्रमाणे मयत सभासदांच्या नावे सदनिका असून त्यांच्या मृत्युपश्च्यात त्यांच्या खालील वारसांनी त्यांच्या नावे सदनिका हस्तांतरीत करणे व संस्थेचे सभासद करून घेण्याकरिता संस्थेकडे लेखी अर्ज केलेले आहेत. संस्थेचे सभासद **कै. कमल प्रभाकर पवार** यांचा मृत्यू **दिनांक : २५/०८/२०१८** रोजी झाला. संस्थेच्या मयत सभासदाने महाराष्ट्र सहकारी संस्थेचा कायदा १९६० नियम १९६१ व उपविधीतील तरतुदिनुसार संस्थेकड़े वारस नोंद केलेली नाही अर्ज केलेल्या खालील वारसदाराव्यतिरिक्त इतर कोणीही मूळ मयत सभासदाचे वारसदार असल्यास किंवा अर्जातील वारसदाराबाबत इतर कायदेशीर सह वारसदारांची काही हरकत असल्यास अशा वारसदारांनी विहित मुदतीत कोणाचेही कोणत्याही प्रकारचे आक्षेप न आल्यास संस्थेकडे वारसदार म्हणून अर्ज केलेले अर्जदारच या मयत सभासदाच्या सदनिकेचे कायदेशीर वारस आहेत असे समजून संस्था अशा अर्जदार व्यक्तींच्या नावे मयत सभासदाचे भाग व संस्थेतील सदनिका हस्तांतरीत करेल व कायदेशीर कारवाईकरीता सबंधित प्रशासकीय कार्यालयाकडे शिफारस करेल. त्यानंतर कोणाचेही कोणत्याही प्रकारचे अर्ज कार्यकारी मंडळ विचारात घेणार नाही.

| रूम नं | मयत सभासदाचे नाव | अर्जदाराचे नाव | नाते | हस्तांतर |
|---|---|---|---|---|
| ११० | कै. कमल प्रभाकर पवार | श्री. विनोद प्रभाकर पवार | मुलगा | |

शॉप क्र. ०७/१५, दुर्गामाता सी.एच.एस,
लल्लूभाई कंपाऊंड, मानखुर्द, मुंबई- ४०० ०४३
दि. १४/११/२०२३

सही/-
**फ्रान्सिस ए. विल्सन**
ॲडव्होकेट हायकोर्ट

# नवी मुंबईत पालिकेकडून रात्रीची स्वच्छता मोहीम

**नवी मुंबई, दि. १३ : प्रतिनिधी**



सध्या दिवाळीत शहरात मोठ्या प्रमाणात फटाक्यांच्या कचऱ्याची वाढ झाल्याने महापालिका प्रशासनानेही याबाबत विशेष खबरदारी घेत 'स्वच्छ दिवाळी, शुभ दिवाळी' या अभियानांतर्गत स्वच्छताविषयक विविध उपक्रम राबविले जात आहेत. त्यानुसार महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या निर्देशानुसार, रात्रीची स्वच्छता मोहीम राबवली जात असून, परिसरातील कचरा लगेच उचलला जात असल्याचे दिसून येते. महापालिकेच्या या उपक्रमाचे नागरिकांकडून स्वागत केले जात असून प्रशासन अणि स्वच्छता कर्मचाऱ्यांना धन्यवाद दिले जात आहेत.

लक्ष्मीपूजनाच्या दिवशी फटाके वाजविण्याचे प्रमाण जास्त असल्याने याच रात्री नवी मुंबई महानगरपालिका परिसरात बेलापूर ते दिघा अशा आठही विभाग कार्यालय क्षेत्रात घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले व उपआयुक्त डॉ. बाबासाहेब राजळे यांच्या नियंत्रणाखाली दि. १३ नोव्हेंबर रोजी पहाटे १ ते ५ वाजेपर्यंत स्वच्छतेची विशेष मोहीम राबविण्यात आली.

या विशेष स्वच्छता मोहिमेकरिता आठही विभाग कार्यालय क्षेत्रात ३७५ सफाई कर्मचारी यांची विशेष नेमणूक करण्यात आली होती. स्वच्छता मोहिमेत गोळा करण्यात आलेला कचरा प्रकल्पस्थळी शास्त्रोक्त प्रक्रियेसाठी वाहून नेण्यात आला.

## २७ टन कचरा केला गोळा

नवी मुंबई शहरातील आठ विभागांतील मुख्य रस्ते, बाजारपेठा, मुख्य चौक, वर्दळीची ठिकाणे अशा नागरिकांची गजबज असलेल्या स्थळांवर पहाटे १ ते ५ या कालावधीत राबविलेल्या, या विशेष साफसफाई मोहिमेमध्ये ९ टन ६०० किलो ओला कचरा तसेच १८ टन १०० किलो सुका कचरा गोळा करून एकूण २७ टन ७०० किलो कचरा स्वतंत्र वाहनांमध्ये तुर्भे येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पस्थळी वाहून नेण्यात आला.

## मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ
(म्हाडाचा घटक)

म्हाडा MHADA

### ई-निविदा सूचना

कार्यकारी अभियंता (पूर्व) विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३६, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१ (दुरध्वनी क्र. ०२२ ६६४०५२५१) यांनी योग्य वर्गवारी तथा शासकीय किंवा निमशासकीय नोंदणीकृत ठेकेदाराकडून एकूण **०९** कामाकरीता **बी-१** (टक्केवारी) नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागविण्यात येत आहेत. विस्तृत ई-निविदा सूचना व निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेत स्थळ http://mahatenders.gov.in, वर उपलब्ध असतील. **निविदा विक्री दिनांक १६.११.२०२३ सकाळी १०.०५ पासून दिनांक २३.११.२०२३ सायंकाळी ६.१५ पर्यंत** राहील. निविदा सूचनेबाबत शुद्धिपत्रक/बदल असल्यास फक्त http://mahatenders.gov.in, संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता (पूर्व) मुं.झो. सु.मंडळ यांनी राखून ठेवला आहे.

सही/-
**कार्यकारी अभियंता (पूर्व),**
**मुं.झो.सु.मंडळ, मुंबई**

CPRO/A/807

म्हाडा-गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

# दिव्यांगांसाठी आपुलकीची 'दिवाळी पहाट'



▶ **ठाणे** : राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना श्रीधर स्वामींची प्रतिमा भेट देताना, ठाण्यातील वृत्तपत्र वितरक अरूण दातार अणि अरविंद दातार.

**ठाणे, दि. १३ : प्रतिनिधी**




दिव्यांगांच्या विविध नृत्यांच्या सादरीकरणाने दिव्यांगांची 'दिवाळी पहाट' रंगली होती. मुकबधिर, कर्णबधिर तसेच दिव्यांग मुलांनी दिव्यांगांच्या 'दिवाळी पहाट'मध्ये उपस्थिती लावून आपल्या कलेचे सादरीकरण केले. दिव्यांग बांधवांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या दृष्टीने 'डॉ. राजेश मढवी फाऊंडेशन'च्यावतीने रविवारी राममारुती रोडवर दिव्यांग मुलांसोबत 'दिवाळी पहाट' साजरी करण्यात आली.

यावेळी आ. संजय केळकर आणि भाजप जिल्हाध्यक्ष आ. निरंजन डावखरे, मृणाल पेंडसे, मा. गटनेते मनोहर डुंबरे उपस्थित होते. यावेळी विविध शाळा, संस्थांतील दिव्यांग, कर्णबधिर आणि मुकबधिर विद्यार्थ्यांनी हजेरी लावली होती.



▶ **वाडा** : केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांच्यावतीने वाडा तालुक्यातील ग्रामीण भागात दिवाळी शिधा वाटप करण्यात आले. याप्रसंगी भाजपचे तालुकाध्यक्ष मंगेश पाटील, स्वीय साहाय्यक नंदकुमार कापसे, वासुदेव पाटील, सरपंच शैला जाबर, उपसरपंच दिलीप पाटील, भाजप महिला आघाडी तालुकाध्यक्षा अंकिता दुबेले, पंढरीनाथ घोडविंदे, सुरेश पाटील, अमित शिर्के, भालचंद्र कासार, नितीन घरत, हर्षद पाटील आदी उपस्थित होते.

## JOY REALTY LIMITED

JOY REALTY LTD. BUILDERS & DEVELOPERS

CIN:L65910MH1983PLC031230

REDG. OFF. : Plot 239-5 Floor-GRD, 239 Yusuf Palace, Lady Jamshedji Road, Shivaji Park, Mahim, Mumbai, Maharashtra, India, Pin - 400016. Tel.: 022-6748 8888,
E-mail: Joyrealty@joydevelopers.com • cs@joydevelopers.com • Website: https://www.joyrealty.in/organisation.aspx

**UNAUDITED STANDALONE FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND HALF YEAR ENDED ON SEPTEMBER 30, 2023**

Amount In Lacs

| Sr. No. | Particulars | Quarter ending 30/09/2023 (Unaudited) | Half year ended on 30/09/2023 cumulative (Unaudited) | Corresponding 3 months ended in the previous year 30/09/2022 (Unaudited) |
|---|---|---|---|---|
| 1. | Total income from operations | 00.00 | 00.00 | 0 |
| 2. | Net Profit / (Loss) for the period (before Tax, Exceptional and/ or Extraordinary items#) | 130.59 | 43.08 | 12.92 |
| 3. | Net Profit / (Loss) for the period before tax (before Exceptional and/or Extraordinary items#) | -19.57 | -51.77 | -30.17 |
| 4. | Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items#) | -19.57 | -51.77 | -30.17 |
| 5. | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | -19.57 | -51.77 | -30.17 |
| 6. | Equity Share Capital | 240.33 | 240.33 | 240.33 |
| 7. | Earnings Per Share (of Rs. /- each) (for continuing and discontinued operations) - | | | |
| | 1. Basic: | (0.81) | (2.15) | (1.26) |
| | 2. Diluted: | (0.81) | (2.15) | (1.26) |

Note: **(A)** The above is an extract of the detailed format of Quarter and half year ended 30.09.2023 unaudited financial results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly/Annual Financial Results are available on the websites of the Stock Exchange(s) and the listed entity. https://www.joyrealty.in/organisation.aspx **(B)** The impact on net profit / loss, total comprehensive income or any other relevant financial item(s) due to change(s) in accounting policies shall be disclosed by means of a footnote. **(C)** Exceptional and/or Extraordinary items adjusted in the Statement of Profit and Loss in accordance with Ind-AS Rules / AS Rules, whichever is applicable.

**For Joy Realty Ltd.**
**Sd/-**
**POOJAN KEYURBHAI MEHTA**
Director & CFO (DIN: 07800003)

Date : 11th November, 2023
Place : Mumbai

## SAGAR PRODUCTIONS LIMITED

CIN: L93000MH1980PLC170432

REDG. OFF. : Unit No. 402, Plot No. B/65, Stanford Plaza, New Link Road, Opp. City Mall, Andheri (W), Mumbai - 400053. E-mail : splgrive@rediffmail.com • Website: www.sagarproduction.com

**UNAUDITED STANDALONE FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND HALF YEAR ENDED ON SEPTEMBER 30, 2023**

(Amount In Lacs)

| Sr. No. | Particulars | Quarter ending 30/09/2023 (Unaudited) | Half year ended on 30/09/2023 cumulative (Unaudited) | Corresponding 3 months ended in the previous year 30/09/2022 (Unaudited) |
|---|---|---|---|---|
| 1. | Total income from operations | 29.02 | 43.94 | 37.1 |
| 2. | Net Profit / (Loss) for the period (before Tax, Exceptional and/ or Extraordinary items#) | 0.93 | -11.25 | -4.26 |
| 3. | Net Profit / (Loss) for the period before tax (before Exceptional and/or Extraordinary items#) | 0.93 | -11.25 | -4.26 |
| 4. | Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items#) | 0.93 | -11.25 | -4.26 |
| 5. | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 0.93 | -11.25 | -4.26 |
| 6. | Equity Share Capital | 776.1 | 401.42 | 401.42 |
| 7. | Earnings Per Share (of Rs. 10 /- each) (for continuing and discontinued operations) - 1. Basic: | 0.00 | (0.01) | (0.01) |
| | 2. Diluted: | 0.00 | (0.01) | (0.01) |

Note: **(A)** The above is an extract of the detailed format of Quarter and half year ended 30.09.2023 unaudited financial Result filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly/Half Yearly Results are available on the websites of the Stock Exchange(s) and the listed entity. www.sagarproduction.com **(B)** The impact on net profit / loss, total comprehensive income or any other relevant financial item(s) due to change(s) in accounting policies shall be disclosed by means of a footnote. **(C)** Exceptional and/or Extraordinary items adjusted in the Statement of Profit and Loss in accordance with Ind-AS Rules / AS Rules, whichever is applicable.

**For SAGAR PRODUCTIONS LIMITED**
Sd/-
**CHETAN MERCHANT** (Director)
DIN: 0863321

Date : 11th November, 2023
Place : Mumbai

# शिवकालीन आरमारी नौका बांधण्याची आवश्यकता

## इतिहासाचे अभ्यासक प्रा. पांडुरंग बलकवडे यांचे मत

**कल्याण, दि. १३ : प्रतिनिधी**

''छत्रपती शिवाजी महाराजांच्या नौका कमी पाण्यातून येऊन, आम्हाला हुलकावणी देतात व पुन्हा सागरी काठावर येतात. त्या नौकांचा पाठलाग करणे कठीण आहे. कारण, आमच्या नौकांसाठी खोल समुद्राची गरज आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधलेल्या नौका चार फूट खोलीतून ही प्रवास करू शकतात आणि आज आपल्याला अशा प्रकारच्या आरमारी नौका बांधण्याची आवश्यकता आहे, याला क्रांती म्हणतात,'' असे प्रतिपादन इतिहास अभ्यासक प्रा. पांडुरंग बलकवडे यांनी केले.

इतिहास संकलन समिती कल्याण जिल्हा व 'संस्कार भारती' कल्याण जिल्हा, अ. भा. कोळी समाज ठाणे जिल्हा यांच्यातर्फे यंदा शिवराज्याभिषेकाचे ३५०वे वर्षं तसेच राजमाता जिजाऊ यांची ३५०वे पुण्यतिथी वर्षं यानिमित्ताने हिंदवी स्वराज्याचा आरमार दिवस कल्याण पश्चिमेतील गणेश घाट येथे नुकतेच साजरा करण्यात आला. यावेळी प्रा. पांडुरंग बलकवडे बोलत होते.




> छत्रपती शिवरायांच्या राज्याभिषेकाचे ३५०वे वर्षं असून, त्या त्यानिमित्ताने राज्यभर शिवकार्याचा जागर होत आहे. तसेच राजमाता जिजाऊंचे ३५०वे स्मृतिवर्ष आहे. या सर्व पवित्र क्षणांचा संगम साधून हा पवित्र कार्यक्रम होत आहे, ही विशेष बाब!
> – **प्रा. पांडुरंग बलकवडे,** इतिहास अभ्यासक

यावेळी प्रसिद्ध अभिनेते 'संस्कार भारती'चे योगेश सोमण, इतिहास संकलन समिती कोकण प्रांत प्रतिनिधी सुरेश खेडकर, माजी माजी मंत्री जगन्नाथ पाटील, रा. स्व. संघ जिल्हा संघचालक डॉ. विवेक मोडक, 'संस्कार भारती'चे संजय गोडसे, सागरी सीमा मंचाचे चंद्रकांत गोसावी, स्वा. सावरकर अभ्यासक दुर्गेश परुळकर, 'संस्कार भारती'चे उदय शेवडे, नाट्य निर्माते संदीप विचारे, रेखा चौधरी आणि राजन चौधरी 'सांस्कृतिक भारत' त्रैमासिकाचे संपादक प्रवीण देशमुख, विभिन्न कोळीवाडे, चंद्रकांत जोशी आदी उपस्थित होते.

कार्यक्रमप्रसंगी महिलांनी दुर्गाडी देवीच्या समोर किल्ल्यावर मातृकलश पूजन करून राजमाता जिजाऊ यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी भोई ज्ञाती समाज कोळीवाडा, कल्याण येथील भगिनींनी भरत भोपी आणि सहकाऱ्यांनी सजवलेल्या पालखीतून हा मातृकलश दुर्गाडीवर नेला आणि दुर्गाडी मातेसमोर कलश पूजन करून, एक अभिनव आदरांजली राजमाता जिजाऊंना वाहिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगेश वाळुंजकर केले, तर डॉ. प्रकाश करमरकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भरत भोपी, दिनेश पाटील, कोळीवाड्यातील तरूण, 'संस्कार भारती'चे अविनाश नेवे, कर्णिक, साठे, मेघना कुळकर्णी, चंद्रकांत जोशी इत्यादींनी परिश्रम घेतले.

### पेण येथून बिबट्याची कातडी जप्त

**अलिबाग** : मुंबई-गोवा महामार्गावरील पेण, उंबर्डे फाटानजीकच्या वाशी नाका येथील म्हात्रे चाळीतून बिबट्याचे सुकलेले कातडे व एक मोटार सायकल जप्त केली. अलिबाग वन विभागाचे उपवनसंरक्षक राहुल पाटील आणि नवी मुंबईतील विशेष पथकाचे उपसंचालक योगेश वरकड यांच्या मार्गदर्शनाखाली साहाय्यक वनसंरक्षक गायत्री पाटील यांच्या नेतृत्वाखाली पेण वनक्षेत्रातील वनपाल, वनरक्षक व फिरते पथक, चालक आदींनी सापळा रचून ही कारवाई केली. सदर प्रकरणी पुढील तपास सुरू असल्याची माहिती साहाय्यक वनसंरक्षक गायत्री पाटील यांनी दिली.

**निवेदन**

**मुंबई तरुण भारतमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिराती या जाहिरातदारांनी दिलेल्या मजकूरानुसार प्रसिद्ध होत असतात. जाहिरातदारांबरोबर अथवा व्यक्तींबरोबर केलेल्या कोणत्याही व्यवहारामुळे कोणत्याही प्रकारचे नुकसान वा हानी झाल्यास त्याबाबत मुंबई तरुण भारत जबाबदार राहणार नाही. आमच्या वाचकांना नम्र विनंती की, त्यांनी जाहिरातदारांबरोबर कोणतेही व्यवहार करण्यापूर्वी योग्य ती खबरदारी घ्यावी.**